Literacy for a Billion

Movie: Dost Asava Tar Asa
Year: 1978

Song: Sangate Aika
Lyricist:

काय बोलला तरूण कुणी का
भलते सलते काही
आज येऊनी तोच बिचारा
लोळण घेतो पायी
लोळण घेतो पायी
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका
बोला
दोघांमधला कलह असे हा
दोघांतच तो ठेवी
पाया पडतो हात जोडीतो
शरणागत मी देवी
हो शरणागत मी देवी
हे गयावया का करसी आता
गयावया का करसी आता
नेक धडा तू घेई
तुझ्यासारख्या अपराध्याला
क्षमा कदापी नाही
क्षमा कदापी नाही
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका

कोमल ओठी
हां हां
कठोर वचने
कधी न शोभा देती
अरे वा
नसो जनाची परि मनाची
मना असावी भिती गं
मना असावी भिती
जना मनाची मला न भिती
जना मनाची मला न भिती
मी रूपाची राणी
परातीत तू जीव देई रे
चाळणीत घे पाणी
चाळणीत घे पाणी
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगते ऐका
शंभर डोळ्यांसमोर झाली
विटंबना ही भारी
अहो शंभर डोळ्यांसमोर झाली
विटंबना ही भारी
मी वैरागी होऊन जातो
फेकून सौख्ये सारी
फेकून सौख्ये सारी

शुभ्र व्हावया केस लागती
वर्षे का हो थोडी
खरे साधूपण साधाया

सव खोटी नकली दाढी
खोटी नकली दाढी
चंद्रमुखी कुणी पडली जर का
संकटी एकाएकी
तिच्या सहाय्या धावून जाऊ
आम्ही तडका फडकी
आम्ही तडका फडकी

झाले गेले विसरा सारे
प्रीत आमची राखा
याच्या पुढची कथा मुकी
हे यंत्र सांगती ऐका
यंत्र थांबले तिथेच थांबू
धुनी चेतवू रंगू
यंत्र थांबले तिथेच थांबू
धुनी चेतवू रंगू
वाटसरूंना मुसाफिरांना
गोष्ट आमुची सांगू
गोष्ट आमुची सांगू
जय हो
स्वामी महाराज की जय हो
तिन्ही जगाचे रहस्य लपले
आपुल्या नयनी स्वामी
नका करू ते जनास उघडे
शपथ घालतो आम्ही
नाही नाही नाही
घोर अपमान झालाय वैराग्याचा

माझं जरा ऐका हो
फेकून द्या ती झोळी आता
काढून टाका दाढी
फेकून द्या ती झोळी आता
काढून टाका दाढी
चुकले म्हणते तीन वेळ मी
धरा जराशी गोडी
धरा जराशी गोडी
सौंदर्याचा असा अनादर
इच्छित आम्ही नाही
जे जे सुंदर तेथे तेथे
दीन दयाघन राही
दीन दयाघन राही
सांगतो ऐका
सांगतो ऐका
तरूण कालचा नको नकोसा
आज हवासा होई
अलभ्य ते या मिठीत जमते
रात चांदणी गाई
रात चांदणी गाई
सांगते ऐका
सांगते ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका
सांगतो ऐका

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.